सन २०१७-१८ च्या टंचाई अंतर्गत लासुर स्टेशन व १३ गांवे, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत असलेल्या गावांसाठी पूरक पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. ५५ /पापु १४

जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,

मंत्रालय, मुंबई ४०० ००१

तारीख: ०९ मे, २०१८

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई १०९९/प्र.क्र. १२/पापु १४, दिनांक ३.२.१९९९

२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई २०१६/प्र.क्र.१४३/पापु १४, दिनांक ४.५.२०१६

३) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे क्रमांक जा.क्र. २०१७/मशाका-२/नैआ-१/कावि-३७९, दिनांक १६.०३.२०१८ व दिनांक ३१.०३.२०१८ ची पत्रं.

३) शासन पत्र क्रमांक बैठक २०१७/प्र.क्र. १७० /पापु १४, दिनांक ०९.०४.२०१८ (बैठकीचे इतिवृत्त)

<u>प्रस्तावना -</u>

विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी लासुर स्टेशन व १३ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत असलेल्या गावांसाठी पूरक पाणी पुरवठा योजनेचा प्रथम रुपये २९०६.४४ लाख व नंतर रुपये २०६४.९४ लाख किंमतीचा सुधारित प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्ताव पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या स्थायी समितीच्या अनुक्रमे दिनांक २०.०३.२०१८ व दिनांक ०३.०४.२०१८ रोजी झालेल्या बैठकांत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला.

स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन योजनेच्या सुधारित प्रस्तावातील Approrach Channel, Jack Well and Pump House, Approach Bridge, या बाबी टंचाई अंतर्गत उपाययोजनेत घेता येत नसल्याने तसेच टंचाई अंतर्गत तात्पुरती पाणी पुरवठा योजना टंचाई कालावधीसाठी अनुज्ञेय असल्याने सदर प्रस्ताव नाकारण्यात आला. तथापि, प्रस्तुत प्रस्तावातील प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या उद्भवात पाणी नसल्याने बंद आहे. त्यामुळे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील समाविष्ट गावांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा लागतो सदर बाब विचारात घेऊन तसेच येथील पाणी टंचाईचा प्रश्न कायमस्वरुपी निकालात काढण्याच्या दृष्टीने या क्षेत्रात पुरक पाणी पुरवठा योजना घेणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव एक विशेष बाब म्हणून, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) यांच्या अभिप्रायानुसार मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला त्यास मा. मुख्यमंत्री महोदयांनी विशेष बाब म्हणून मान्यता दिली असून योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन व सोबत जोडलेल्या परिशिष्टातील कामांचा समावेश असलेल्या रुपये २०६३.०२ लाख (रुपये वीस कोटी, त्रैसष्ट लाख, दोन हजार फक्त) इतक्या किंमतीच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी लासुर स्टेशन व १३ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या संबंधित गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्वप्रथम घोषित करावे.

२) सदर प्रस्तावात नमूद केलेली लासुर स्टेशन व १३ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत तात्पुरती पुरक नळ पाणी पुरवठा योजनेची कामे कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांचेमार्फत करण्यात यावीत.

३) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. जादा किंमतीच्या निविदा स्वीकृत करु नयेत.

४) निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर करार पत्रातील अटी व शर्तीनुसार दिलेल्या मुदतीतच योजना पुर्ण होणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही.

५) योजनेचे काम प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी. त्यापेक्षा जास्त खर्च केल्यास त्याकरिता शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. योजनेची किंमत वाढल्यास त्याची शासनस्तरावरुन गंभीर दखल घेऊन संबंधितांवर शिस्तभंग कार्यवाही करण्यात येईल.

६) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, औंरगाबाद यांच्या दिनांक २७.०३.२०१८ च्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटींचे पालन व पुर्तता करावीत.

७) योजनेच्या अंमलबजावणीमध्ये कोणत्याही स्वरुपाची अनियमितता, अपहार अथवा गैरव्यवहाराच्या बाबी निदर्शनास आल्यास त्यास जबाबदार संबंधित अधिकारी / कर्मचारी शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र राहतील.

८) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी सदर योजनेकरिता निविदा प्रक्रिया झाल्यानंतर योजनेच्या सुरुवातीला ५०% इतका निधी द्यावा. उर्वरित निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतर देण्यात यावा.

९) योजनेचे काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनेच्या निविदा प्रक्रीयेपासून ते योजनेतून पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१- अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (अनिवार्य) (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, मा. मंत्री, मदत व पुनर्वसन तसेच मा. मुख्यमंत्री महोदयांनी विशेष बाब म्हणून दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे .

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०७१२२१३१४६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Bhagwan Sawant

Digitally signed by Mahesh Bhagwan Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1f670a17d77c8ddff69694de2a07b7ff855dafef954aefa82ca28bd6cc6adb6, cn=Mahesh Bhagwan Sawant
Date: 2018.05.09 11:44:57 +05'30'

(महेश सावंत)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर

३. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
८. विभागीय आयुक्त, औरंगाबाद
९. जिल्हाधिकारी, औरंगाबाद
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद
११. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद
१२. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद
१३. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद
१४. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद
१५. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१६. उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१७. पापु १४ (निवडनस्ती)

परिशिष्ट

लासुर स्टेशन व १३ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत असलेल्या गावांसाठी पूरक पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकामध्ये खालीलप्रमाणे कामे मान्य करण्यात आलेली आहे :-

Sr.No.	Name of Subwork	Amount
1	Approach Channel L=30M	23,78,100.00
2	Jack Well and Pump house	46,99,600.00
3	Approach Bridge L=85M	58,36,600.00
4	Raw Water Pumping Machinery 105 HP VT pump 2+1 no.	1,09.59,510.00
5	Raw Water Rising Main 250 mm DI K-9 pipe 48.00 km Jack well to WTP AT Palked	16,98,89,600.00
	Total	19,37,63,410.00
6	Add 4 % supervison Charges	77,50,536.00
	Total Rs	20,15,13,946.00
7	MSEDCL Charges	47,89,260.00
	Total Rs	20,63,03,206.00
	Total Gross Cost Rs	20,63,03,206.00
	Say	20,63,03,200.00
		2063.03 Lakh

Mahesh Bhagwan Sawant

Digitally signed by Mahesh Bhagwan Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1f670a17d77c8ddff69694de2a07b7ff855dafef954aefa82ca28bd6cc6adb6, cn=Mahesh Bhagwan Sawant
Date: 2018.05.09 11:45:40 +05'30'

(महेश सावंत)
उप सचिव , महाराष्ट्र शासन